# मोहोळांचा भर पक्षांतर्गत भेटीगाठींवर

## माजी खासदार अनिल शिरोळे, खासदार मेधा कुलकर्णी, जगदीश मुळीक, योगेश गोगावले यांच्या भेटी

**पुणे :** लोकसभा मतदारसंघाचे भारतीय जनता पार्टी महायुतीचे उमेदवार मुरलीधर मोहोळ यांनी उमेदवारी जाहीर होताच पक्षांतर्गत भेटीगाठी घेत प्रचाराला सुरुवात केली आहे. इच्छुक उमेदवार आणि महत्त्वाच्या पदाधिकाऱ्यांची घरी जावून भेट घेत प्रचारात आघाडी घेतली आहे. या भेटींना सकारात्मक प्रतिसाद मिळत असून भेटींमुळे पदाधिकाऱ्यांमध्ये उत्साह वाढत असल्याचे चित्र आहे. शिवाय या भेटींदरम्यान मोहोळ यांचा विजय मताधिक्याचा उच्चांक गाठेल, असा विश्वास राज्यसभा खासदार प्रा. मेधा कुलकर्णी यांनी व्यक्त केला.

भारतीय जनता पार्टीने निवडणूक जाहीर होण्यापूर्वीच उमेदवाराची घोषणा केल्याने प्रचाराली लागलीच सुरुवात झाली आहे. मोहोळ यांनी प्रचाराच्या पहिल्या टप्प्यात पक्षांतर्गत भेटीगाठींना प्राधान्य दिल्याने संघटना पातळीवर सर्वच घटक कार्यरत करण्याचा मोहोळ यांचा प्रयत्न आहे. मोहोळ यांनी सर्वात आधी त्यांचे राजकीय गुरु माजी खासदार अनिल शिरोळे यांची भेट घेत संवाद साधला. आपल्याच तालमीतील पैलवान लोकसभेच्या आखाड्यात आल्याने शिरोळे यांच्या चेहऱ्यावर आनंदाचे भाव दिसून आले. शिवाय शिवाजीनगरचे



**मोहोळ विक्रमी मतांनी विजयी होतील : खा. मेधा कुलकर्णी**

**मोहोळ यांचा विजय निश्चित असून त्यांचा हा विजय आजवर मिळालेल्या विजयांपेक्षा अधिक मतांचा असेल, असा विश्वास खा. कुलकर्णी यांनी व्यक्त केला. भारतीय जनता पार्टीच्या वतीने आता अधिकच्या मताधिक्यासाठी आम्ही तयारी करत आहोत. मोहोळ यांच्याशी प्रचाराच्या रणनितीसंदर्भातही बोलणे झाले आहे, असेही खा. कुलकर्णी म्हणाल्या.**

मा. आमदार विजय काळे यांच्याशीही मोहोळ यांनी संवाद साधला.

कोथरुडच्या माजी आमदार आणि राज्यसभेच्या नवनिर्वाचित खासदार प्रा. मेधा कुलकर्णी यांच्याही घरी मोहोळ यांनी भेट देत लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर चर्चा केली. यावेळी खा. कुलकर्णी यांनी मोहोळ यांचे औक्षण करत विजयाचा संकल्प केला. मोहोळ आणि खा. कुलकर्णी एकत्र आल्याने याचा मोठा फायदा कोथरुड विधानसभेच्या मताधिक्यात होईल, अशी शक्यता राजकीय जाणकारांना आहे. शहर भाजपाचे माजी अध्यक्ष योगेश गोगावले यांचीही भेट मोहोळ यांनी घेऊन त्यांनाही प्रचारात सक्रिय करण्याचा प्रयत्न केला आहे.

भेटींबाबत मोहोळ म्हणाले, ङ्भारतीय जनता पार्टी ही केवळ पार्टीच नाही तर परिवार आहे. त्यामुळे सर्वात आधी परिवारातील घटकांशी संवाद आणि भेटी आवश्यक असतात. शिवाय या निमित्ताने जुन्या आठवणींनाही उजाळा मिळतो. या सर्व भेटींमधून सर्वांचा मिळालेला सकारात्मक प्रतिसाद माझ्या प्रचाराचा उत्साह वाढवणारा आहे. पुढील काळातही या भेटीगाठी कायम सुरु राहणार आहेत.

# वय झालं म्हणून कमजोर समजू नका;

## अजिदादांचे बंधू श्रीनिवास पवार यांचा इशारा

**बारामती :** उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे धाकटे बंधू श्रीनिवास पवार यांनी ज्येष्ठ नेते शरद पवार यांना साथ देण्याचा निर्णय जाहीर करत साहेबांचे वय झाले, म्हणून त्यांना कमजोर समजू नका. तुम्हाला तीन वेळा उपमुख्यमंत्री व २५ वर्ष मंत्री केले, हे विसरू नका, शेतकऱ्याला दिलं म्हणजे कोणी मालक होत नाही, असा उपरोधिक टोला त्यांनी काटेवाडी मध्ये ग्रामस्थांशी बोलताना बंधू अजित पवार यांना नाव न घेता लगावला.

काटेवाडी या ठिकाणी आयोजित घोंगडी बैठकीत श्रीनिवास पवार यांनी आपली भूमिका स्पष्ट करत ते म्हणाले,भाऊ म्हणून आतापर्यंत अजितदादांचे सर्व काही ऐकले, चांगल्या व वाईट काळातही भाऊ म्हणून मी साथ दिली. तो म्हणेल तशी मी उडी मारली. साहेबांचे आमच्यावर किती उपकार आहेत, हे गावकऱ्यांना माहित आहे. त्यांचे वय ८३ झाले आहे, त्यामुळे त्यांना सोडण हे मला पटलं नाही. माझे मित्रही मला म्हटले साहेबांचे वय झालं आहे, मात्र हा विचार मला वेदना देऊन गेला. कारण पुढची १० वर्षे समोरच्या माणसाकडून आपल्याला लाभ मिळणार आहे, असा विचार करणे नालायकपणाचे आहे. शेत आपल्या नावावर केलं म्हणजे वडिलांना घराबाहेर काढायचे का, असा सवाल करत श्रीनिवास पवार म्हणाले, पहिल्या दिवसापासून ज्यांना जे काही पदे



मिळाली, ती साहेबांमुळे मिळाली. त्यांच साहेबांना आत्ता म्हणायचं घरी बसा, आता कीर्तन करा, हे माझ्या मनाला पटण्यासारखं नाही, मी जरा वेगळा माणूस आहे. मला जे पटत नाही, ते मी करत नाही. माझे वर्ग मित्र देखील मला न सांगता तिकडे गेले. काही गोष्टींची उदाहरणार्थ औषधांची एक्सपायरी डेट असते, तशी नात्यांची देखील एक्सपायरी डेट असते, तशी एक्सपायरी डेट संपली म्हणायचं आणि पुढे चालायचं वाईट वाटून घ्यायचं नाही, माझे वय ६० वर्षे आहे, त्यामुळे मला दबून जगायचं नाही, दबून वगायच नाही. मला स्वाभिमानाने जगायचंय. मरावे परी कीर्ती रुपी उरावे, ही म्हण आहे, मात्र मला ही म्हण पटली नाही, मेल्यानंतर त्या कीर्तीचा काय उपयोग?, असा सवाल पवार यांनी व्यक्त करत केवळ लाभार्थी आहे म्हणून त्यांच्या मागे जायचं, हे योग्य नाही. मात्र प्रत्येकाला विचार स्वातंत्र्य आहे.

रेमंड कंपनीचे मालक सिंघानिया यांचे उदाहरण देत सिंघानिया यांनी

**नेहमी राजकारणापासून दूर असलेले व उद्योग व्यवसाय सांभाळणारे श्रीनिवास पवार यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या भूमिके बाबत थेट त्यांच्यावर टीकास्त्र केले. दरम्यान श्रीनिवास पवार यांचे पुत्र युगेंद्र पवार यांनी गेल्या काही दिवसांपासून बारामती शहर व तालुक्यामध्ये खासदार सुप्रिया सुळे यांच्या प्रचारार्थ कोपरा सभा सुरू केल्या आहेत.**

आपल्या मुलाच्या ताब्यात सर्व उद्योग सोपवला, नंतर त्या मुलानेच सिंघानिया यांना बाहेर काढले,

तसेच गेली २५-३० वर्ष ज्येष्ठ नेते शरद पवार दिल्लीमध्ये केंद्रात असताना त्यांनी अजितदादांवर महाराष्ट्रातील जबाबदारी सोपवली, आता साहेबांनाच बाहेर काढले. मी माझ्या कारखान्याची जबाबदारी मुलावर सोपवली, २५ वर्षानंतर त्या कारखान्यात मी गेल्यानंतर त्या ठिकाणी आत मध्ये मला वॉचमन देखील सोडत नसेल तर... तशी परिस्थिती सध्या बंधू अजित पवार यांनी केली असल्याचे श्रीनिवास पवार यांनी सांगितले. आपल्या वडिलांचे वय झाले तरी आपण त्यांची काळजी घेतो, त्यांची दवा पाण्याची सोय करतो, हे आपले ग्रामीण भागातील संस्कार आहेत, असे पवार यांनी सांगितले. यावेळी श्रीनिवास पवार यांच्या पत्नी शर्मिला पवार यांच्यासह इतर ग्रामस्थ उपस्थित होते.

# आचारसंहितेचे काटेकोर पालन करा अन्यथा कडक कारवाई : तहसीलदार हेळकर



**शिरोळ :** भारतीय लोकशाहीतील सर्वात मोठ्या उत्सवात सर्वांनी सहकार्य करून आचारसंहितेच्या नियमांचे काटेकोरपणे पालन करावे, सोशल मीडियाच्या माध्यमातून आचारसंहिता भंग होणार नाही याची काळजी घ्यावी, अन्यथा कायदेशीर कारवाईला सामोरे जावे लागेल, असा इशारा सहाय्यक निवडणूक अधिकारी तथा तहसीलदार अनिल कुमार केळकर यांनी दिला.

लोकसभा निवडणुक आणि आदर्श आचारसंहितेच्या पार्श्वभूमीवर आयोजित पत्रकार बैठकीत ते बोलत होते. यावेळी नोडल ऑफिसर तथा शिरोळ पोलीस ठाण्याचे पोलिस निरीक्षक शिवाजी गायकवाड उपस्थित होते.

यावेळी बोलताना तहसीलदार अनिलकुमार हेळकर म्हणाले, आयोगाकडून प्रक्रियेतील सर्व प्रकारच्या सूचना प्राप्त झाल्या आहेत. आदर्श आचार संहिता लागू झाल्यामूळे प्रत्येक सार्वजनिक कार्यक्रम, राजकीय कार्यक्रम आता निवडणूक प्रशासनाकडून बारकाईने तपासले जाणार आहेत. शिरोळ तालुक्यात एकूण पाच ठिकाणी चेकपोस्ट उभारण्यात आले असून ६ भरारी पथकांची नियुक्ती करण्यात आली आहे. कोणत्याही परिस्थितीत निवडणुकीच्या कालावधीत शांतता भंग होणार नाही याची संपूर्ण काळजी प्रशासनाच्या वतीने घेण्यात आले असून निवडणूक प्रक्रियेतील परवानगी घेण्याकरता एक खिडकी व्यवस्था करण्यात आली आहे असल्याचे त्यांनी यावेळी बोलताना सांगितले.

यावेळी बोलताना यावेळी नोडल ऑफिसर तथा शिरोळ पोलीस ठाण्याचे पोलिस निरीक्षक शिवाजी गायकवाड म्हणाले, लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मागील पंचवार्षिक निवडणुकीत ज्यांच्यावर गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल आहेत अशांची यादी तयार त्यांच्यावर प्रतिबंधक कारवाई करण्यात येणार असल्याचे सांगितले त्याचबरोबर शिरोळ, कुरुंदवाड आणि जयसिंगपूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत असणाऱ्या चेक पोस्टवर पोलीस कर्मचारी, गृहरक्षक दलाचे जवान तैनात करण्यात आले असल्याचे सांगितले. निवडणुकीच्या काळात कोणताही अनुसूचित प्रकार घडू नये यासाठी सीमा सुरक्षा दलाची एक तुकडी मागविण्यात आले असल्याचे सांगितले.

या पत्रकार बैठकीस गटविकास अधिकारी शंकर कवितके, शिरोळचे मुख्याधिकारी निशिकांत प्रचंडराव, निवडणूक विभागाचे अधिकारी संदीप हांगे यांच्यासह निवडणूक विभागातील अधिकारी उपस्थित होते.




# ज्येष्ठांना लुटणाऱ्या महिलांना नारायणगाव पोलिसांकडून अटक

**नारायणगाव :-** आपल्या सौंदर्याची भुरळ पाडून ज्येष्ठ नागरिक बँकेत पैसे काढायला आल्यानंतर त्यांना टार्गेट करून लुटणाऱ्या दोन परप्रांतीय सौंदर्यवती चोरट्या महिलांना नारायणगाव पोलिसांकडून अटक करण्यात आली आहे. अशी माहिती सहायक पोलीस निरीक्षक महादेव शेलार यांनी दिली.

याबाबत माहिती अशी की १२ मार्च २०२४ रोजी दुपारी साडेअकरा वाजताच्या सुमारास नारायणगाव येथील बँक ऑफ इंडिया च्या शाखेमध्ये या घटनेतील फिर्यादी नंदराम उमाजी गाढवे (वय ६७, धंदा शेती राहणार आर्वी तालुका जुन्नर जिल्हा पुणे) हे मोटरसायकल घेण्यासाठी बँकेत पन्नास हजार रुपये रोख रक्कम काढण्यासाठी आले होते. पन्नास हजार रुपये रक्कम काढल्यानंतर आपल्या पॅन्टच्या खिशात ही रक्कम ठेवली काही वेळानंतर ती अज्ञात इसमाने हातचलाखीने काढून घेतल्याचे त्यांच्या लक्षात आले. याबाबतचा गुन्हा त्यांनी नारायणगाव पोलीस ठाण्यात दाखल केला. या घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी भेट देऊन सीसीटीव्ही फुटेज च्या आधारे दोन संशयित महिलांना ताब्यात घेतले. आरोपी सोनिका निरोत्तम सिसोदिया (वय ३५, व्यवसाय कपडे विक्री, राहणार गुलखेडी तालुका पाचोर, जिल्हा राजगड, राज्य मध्य प्रदेश) व उपासना डॅनी भानेरिया (वय २०, राहणार कडिया तालुका पाचोरा जिल्हा राजगड राज्य मध्य प्रदेश) या दोन चोरट्या महिलांनी फिर्यादी नंदराम गाढवे यांच्या खिशातून पन्नास हजार रुपये चोरले असल्याची कबूली दिली.

दरम्यान या दोन चोरट्या महिलांना जुन्नर न्यायालयात हजर केले असता त्यांना पाच दिवसांची पोलीस कोठवडी सुनावण्यात आली आहे या घटनेचा पुढील तपास पोलीस हवालदार रमेश काठे करीत आहेत.

# सोने पुन्हा ६६ हजारांवर !

**नागपूर -** आंतरराष्ट्रीय घडामोडींमुळे नागपुरातील सराफा बाजारात सोमवारी सोन्याचे दर पुन्हा वाढले. खुलत्या बाजारात सकाळी जीएसटीविना ६५,५०० रुपयांवर असलेले दहा ग्रॅम शुद्ध सोन्याचे दर सायंकाळी ६६ हजार रुपयांवर पोहोचले.

शनिवारच्या तुलनेत सोमवारी सोने ३०० आणि चांदीचे दर प्रतिकिलो ४०० रुपयांनी वाढले. शनिवारी दहा ग्रॅम शुद्ध सोन्याचे दर ६५,७०० रुपये होते. सोमवारी खुलत्या बाजारात दर ३०० रुपयांनी कमी होऊन ६५,५०० रुपये, दुपारी ६५,७०० आणि सायंकाळी बाजार बंद होताना भाव पुन्हा एकदा ६६ हजारांच्या ऐतिहासिक पातळीवर पोहोचले. काही दिवसांपासून सोन्याच्या दरवाढीमुळे सराफा बाजारात ग्राहकांची चांगलीच गर्दी असून उत्साहाचे वातावरण आहे.

सध्या सोन्याचे दर कमी होण्याची काहीही शक्यता नाही. १ मार्चपासून दोन्ही मौल्यवान धातूंचे दर वाढतच आहेत. वाढत्या दरासोबतच लोकांची खरेदीही वाढली आहे. एका आठवड्यात चांदीच्या प्रति किलो २,३०० रुपयांची वाढ झाली.

# ५ कोटींपर्यंत होणार गुलालाची विक्री!

**नागपूर :** यंदा होलिका दहन २४ मार्च आणि धुलिवंदन २५ मार्चला असून लोक होळीच्या रंगात रंगलेले दिसतील. काही वर्षांपासून होळीप्रेमी रंगाच्या तुलनेत गुलालाला जास्त प्राधान्य देत आहेत. होळीनिमित्त बाजारात प्रचंड उत्साह असून ५०० टनांहून अधिक गुलालाची उधळण अर्थात ५ कोटींहून अधिक गुलाल विक्रीची व्यापाजयांना अपेक्षा आहे.

**नागपुरात लहानमोठे ३० उत्पादक**

होळीला एक आठवड्याचा कालावधी उरला असून गुलाल उत्पादक आणि रंग विक्रेत्यांची तयारी जोरात आहे. गेल्या आठवड्यात नागपुरात दोनदा वादळी पाऊस आल्याने गुलाल उत्पादक आणि विक्रेत्यांची अडचण झाली. तसे पाहता गुलालाची निर्मिती तीन महिने आधीपासूनच सुरू होते. गुलाल २५ किलोच्या बोरीत विकला जातो. नागपुरात ७ ते ८ मोठे २५ हून अधिक लहान गुलाल उत्पादक आहेत. नागपुरातून संपूर्ण विदर्भ, छत्तीसगड आणि मध्यप्रदेशात गुलालाची विक्री होते. घाऊक बाजारात दर्जानुसार



गुलाल ६० ते १०० रुपये किलो आणि किरकोळ बाजारात १५० रुपयांपर्यंत भाव आहेत.उत्पादक सीताराम काचुरे म्हणाले, नागपुरात गुलालाची वर्षभर विक्री होते. परंतु होळीला सर्वाधिक विकला जातो. आर्गेनिक गुलाल आरारोट आणि मका पीठापासून तयार होतो. हा गुलाल २०० रुपये किलोपर्यंत विकला जातो. यामध्ये उच्च दर्जाचा रंग आणि सुगंधित द्रव्याचा उपयोग केला जातो. कमी किमतीच्या गुलालात डोलोमाईट पावडरचा उपयोग होतो. त्यामुळे शरीराला इजा होऊ शकते. गुलाल जवळपास १२ रंगात तयार होतात.तीन महिन्यांपासून गुलालाची निर्मिती

गुलालाची निर्मिती तीन महिने आधीपासून सुरू होते. होळी सणात गुलाल उत्पादनातून २०० हून अधिक लोकांना रोजगार मिळतो. आरारोट अथवा मका पीठ रंगात भिजवून खुल्या मैदानात उन्हात वाळवावे लागते.

विविधरंगी गुलाल दीडपटीने महाग

गुलाल तयार करण्यासाठी लागणारे आरारोट, रंग आणि ऑईल महागल्याने यंदा किमती दीडपटीने वाढल्या आहेत. याशिवाय क्रूड ऑईलच्या किमती वाढल्यामुळे प्लास्टिक दाणेही महाग झाले आहेत. दाण्यापासून तयार झालेल्या प्लास्टिच्या पिचकारीसह अन्य वस्तूंच्या किमती दुपटीवर गेल्या आहेत. जास्त किमतीत खरेदी करावे लागत असल्याचे घाऊक विक्रेत्यांनी सांगितले. विविध कंपन्यांचे रंग १० ते ५० ग्रॅम आणि गुलाल ५० ते १०० ग्रॅम पॅकिंगमध्ये आहेत.

**हर्बल गुलालाला सर्वाधिक मागणी**

लोक आता आरोग्यप्रती सजग झाले आहेत. त्यामुळे पारंपारिक आणि हर्बल गुलालाला जास्त मागणी आहे. हर्बल गुलाल साध्याच्या तुलनेत ३० टक्के महाग असतो. त्याला लागणारा आरारोट, रंग, ऑईल आणि मजूरी वाढली आहे. यावर्षी मागणीच्या तुलनेत पुरवठा कमी असल्याचे उत्पादकांचे मत आहे.